दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३३८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.४ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# रेवस ते रेड्डी सागरी महामार्ग प्रकल्पांतर्गत संलग्न रस्ते व सागरी पूल विकास प्रक्रियेला वेग

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री व कोकणचे सुपुत्र कै.बॅ.ए.आर. अंतुले साहेबांनी कोकणच्या विकासासाठी रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रेड्डीपर्यंत सागरी महामार्ग विकसित करण्याचा संकल्प केला होता. तद्नंतर बहुप्रतिक्षीत असलेल्या या सागरी महामार्गाची उभारणी करण्याचा मनोदय राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समर्थ नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या महाविकास आघाडी सरकारने केला. तसेच कोकण पर्यटन विकासासह सर्वांगिण विकासासाठी महत्त्वाची भूमिका असलेल्या या सागरी महामार्ग प्रकल्पास विशेष महत्त्व दिले आहे. बहुप्रतिक्षीत सागरी महामार्ग कालबद्ध कालावधीत पूर्णत्वास यावा यासाठी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयामध्ये गठीत केलेल्या प्रोजेक्ट मॉनिटरींग युनिटमध्ये या प्रकल्पाच्या समावेशासाठी उपमुख्यमंत्री पवार यांना आग्रहाची विनंती केली. या युनिटच्या बैठकांमध्ये या प्रकल्पाचा नियमित प्रगती आढावा घेवून प्रकल्पासाठी शासन स्तरावरील रितसर मान्यता मिळण्यास गती मिळत आहे.**

शासनाने रेवस ते रेड्डी सागरी महामार्ग या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांस कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्त केले आहे. महामंडळामार्फत या सागरी महामार्गातील पहिल्या टप्प्यात रायगड जिल्ह्यातील रेवस ते कारंजा जोडणाऱ्या खाडी पुलाचे बांधकाम करणे, डहाणू बोर्डी–रेवस–रेड्डी सातर्डे रस्ता सागरी महामार्ग क्र. ४ वरील कोलमांडला वेश्वी दरम्यान बाणकोट खाडीवरील उर्वरीत पुलाचे काम पूर्ण करणे, रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील केळशी खाडीवरील पुलाचे काम करणे व प्रस्तावित आखणीमध्ये सागरी महामार्गाकरीता बाह्यवळण व रुंदीकरणासाठी आवश्यक जागेसाठी भूसंपादन करणे व भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या दोन प्रमुख ठिकाणांस जोडणाऱ्या रस्त्यांचे बांधकाम करणे या कामांचा समावेश आहे. तर दुसऱ्या टप्प्यात प्रस्तावित आखणीमधील उर्वरित सर्व पुलांचे काम पूर्ण करणे, उर्वरीत रस्ता, बाह्यवळण रस्ते व पुलांचे बांधकाम करणे या कामांचा समावेश आहे. शास–नाने महामंडळास ही कामे टप्पानिहाय हाती घेवून पूर्ण करण्यास नुकतीच मान्यता प्रदान केली आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदय यांच्याकडे रायगड पालकमंत्री कु. आदिती तटकरे व रायगड–रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनिल तटकरे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नास व पाठपुराव्यास यश प्राप्त झाले आहे.

रेवस–रेड्डी सागरी महामार्गाची व्यापकता विचारात घेवून सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रायगड जिल्ह्यातील करंजा ते रेवस खाडी पूलाच्या कामाची ८५० कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे व नजिकच्या कालावधीमध्ये या खाडी पूलाचे बांधकाम सुरू करण्याचे नियोजन केले आहे. जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी केलेल्या सततच्या पाठपुराव्याची फलश्रुती या माध्यमातून होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार्यातून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या सागरी महामार्गाच्या टप्प्या–टप्प्यात होणाऱ्या कार्यामुळे हा प्रकल्प उभारणी प्रक्रियेस वेग मिळाला असून कालबद्ध कालावधीत ही प्रकल्प पूर्णत्वास येईल, असा विश्वास रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.तटकरे यांनी व्यक्त केला.



**डॉ.सचिनदादा धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त व युरोपियन युनियन, पॅरिस यांच्या वतीने मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल आदरणीय डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी व आदरणीय डॉ.सचिनदादा धर्माधिकारी यांच्या रेवदंडा येथील निवासस्थानी जाऊन पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या व स्वारीचें शुभाशीर्वाद घेतले.**



**रायगड भूषण निरुपणकार सचिनदादा धर्माधिकारी यांना युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टिट्यूटकडून मानाची डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली आहे. त्याबद्दल तसेच रायगड भूषण आदरणीय डॉ.श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रेवदंडा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.**

# ना.नबाव मलिक यांच्यावरील ईडीच्या गैरकारवाईबाबत राष्ट्रवादीने काढला मोर्चा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री नबाव मलिक यांच्यावर ईडीचा गैरवापर करून केंद्र सरकारने केलेल्या कारवाईबाबत आज पनवेलमधील प्रांत कार्यालयावर राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे निषेध मोर्चा काढण्यात आला होता.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील व जिल्हा उपाध्यक्ष आर.एन.यादव यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने आज सकाळी ठाणा नाका ते प्रांत कार्यालय पनवेल असा मोर्चा काढून यावेळी केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला. या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेसचे ताहिर पटेल, महिला आघाडीच्या शशिकला सिंह, अमिता चौहान, विद्या चव्हाण, सुनील मोहोड, विजय मयेकर, संजय परब, नेहा पाटील, बळीराम नेटके, दर्शन ठाकूर, परशुराम सुरते, अमित लोखंडे, महादेव पाटील, प्रसाद पिंगळे, जितेंद्र यादव आदींसह मोठ्या प्रमाणात शेकडो संख्येने राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

> अशा प्रकारच्या कारवाया म्हणजे चुकीचे राजकारण सुरू आहे ते केंद्राने त्वरित थांबवावे. जो कोणी केंद्र व विरोधी पक्षाविरोधात आवाज उठवितो त्याचावर ईडीची कारवाई करण्यात येते हे महाराष्ट्राच्या राजकारणासाठी घातक आहे
> **: आर.एन.यादव, जिल्हा उपाध्यक्ष**

> केंद्रीय तपास यंत्रणा (ईडी) महाराष्ट्रात सातत्याने सत्ताधारी पक्षातील राजकीय व्यक्तींवर वारंवार सुडबुद्धीने कारवाई करीत आहे. परंतु ही कारवाई निपक्षपाती होणे गरजेचे आहे.
> **: सुदाम पाटील, प्रदेश सरचिटणीस**

राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे करण्यात आलेल्या निषेध मोर्चाला मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. यातून पनवेल तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद दिसून आली. यात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. असे असले तरी पक्षातील महत्वाच्या पदाधिकाऱ्यांनीच या निषेध मोर्चाकडे पाठ फिरविल्याने याची चर्चा मोर्चात होती.

# पनवेल तालुका सहकारी भातगिरणीच्या चेअरमनपदी रवींद्र पाटील



**दै.रायगड नगरी । पनवेल**

विशेष सभेमध्ये पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृहामध्ये पनवेल तालुका तालुका सहकारी भातगिरणीच्या चेअरमन पदी रवींद्र पाटील यांची सर्वानुमते निवड झाली तसेच शेतकरी कामगार पक्षाचे ११ संचालक बिनविरोध निवडून आले.

या सर्वांना शुभेच्छा देण्यासाठी शेकापक्षाचे जेष्ठ नेते मा.नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, शेकापक्षाचे जेष्ठ नेते माजी तालुका चिटणीस नारायणशेठ घरत, मा.सभापती काशिनाथ पाटील, एपीएमसी चे सभापती डॉ.दत्तात्रेय पाटील, पमपा विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शेकाप तालुका चिटणीस राजेश केणी, मा.चेअरमन एम सी पाटील, मा.व्हाईस चेअरमन राजेंद्र घरत, नैना कमिटीचे अध्यक्ष व संचालक वामन शेळके, पनवेल अर्बन बँक संचालक माधुरी गोसावी, कामगार नेते प्रकाश म्हात्रे, नगरसेवक प्रमोद भगत, नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील, पमपा सहचिटणीस देवेंद्र मढवी, युवा जिल्हा अध्यक्ष देवेंद्र पाटील, एपीएमसी सचिव भरत पाटील, खारघर शहर चिटणीस अशोक मोरे, तळोजा शहर चिटणीस प्रताप पाटील, पनवेल तालुका सहकारी भातगिरणीचे संचालक मंडळ मीरा विजय म्हात्रे, लिला मारुती भस्मा, गणेश गायकर, दिनकर मुंढे, दत्तात्रय मोरे, अनंता कांबळे, नारायण तुपे, गणेश कोळी, भातगिरणीचे सचिव संदीप केणी, कर्मचारी रुपेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त...


### नवाब मलिक अडचणीत, ७ मार्चपर्यंत ईडीच्या कोठडीत वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या प्रकरणी आज कोर्टात पुन्हा सुना–वणी झाली. ३ मार्च रोजी मलिकांची कोठडीची मुदत संपल्यानंतर आज त्यांना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी नवाब मलिक यांच्या वकीलांनी जामीन मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु ईडीच्या वकिलांनी त्याला विरोध केला. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर कोर्टाने नवाब मालिक यांची ७ मार्चपर्यंत ईडीची कोठडी वाढवण्याचा निर्णय दिला.

नवाब मलिक यांना कोर्टात हजर केले त्यावेळी न्यायाधीशांनी त्यांचा मेडिकल रिपोर्ट मागितला. अनिल सिंग यांच्याकडून कोर्टाला रिमांड अर्जातील माहिती वाचून दाखवली. ईडीचा बाजू मांडणार अस–लेले अतिरिक्त महान्यायअभिकर्ता अनिल सिंग यांना येण्यास विलंब होत असल्याने मलिक यांचे वकील अमित देसाई यांनी न्यायाधीश राहुल रोकडे यांच्यासमोर नाराजी व्यक्त केली. सिंग दहा मिनिटांत येतील, अशी माहिती सरकारी वकील सुनील गोंसलविस यांनी कोर्टाला दिली.

# सेझविरोधात पाणजे पाणथळ छोडो आंदोलन



**दै.रायगड नगरी । उरण**

शहरातील हरितप्रेमींनी एनएमएसईझेडकडे पाणजे मुक्तीचे आवाहन करणारे ‘क्वीट् पाणजे’ अभियान सुरू करीत उरण तालुक्यातील पाणजे क्षेत्र हे पाण–थळीचे असल्यामुळे राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) आणि नॅशनल वेटलँड डिकेडल चेंज अटलासच्या शिक्कामोर्तबाचा दाखला देण्यात आला आहे. या क्षेत्रात भरतीच्या पाण्याचा जोडमार्ग असून त्यावर कांदळवने आणि दलदलीचे प्रदेश तग धरून असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे भारत छोडो आंदोलनापासून प्रेरणा घेत आम्ही हे अभियान राबविण्याचे ठरवले. असे नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले. एनएमएसईझेडकडून या भागात ठेवण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांना प्रमाणाबाहेर अधिकार देण्यात आले असून त्यांची मजल स्थानिक मच्छीमार, सिडको–नियुक्त बीएनएचएसचे पक्षी निरीक्षक, मिडिया प्रतिनिधि आणि वन्यजीव छायाचित्रकारांना दमदाटी करण्यापर्यंत गेली असल्याची माहिती कुमार यांनी बोलताना दिली आहे.

नॅटकनेक्टला केंद्रीय वाणिज्य मंत्रालय कडून प्राप्त झालेल्या माहितीतून फेब्रुवारी २०१९ दरम्यान एनएमएसईझेड डी– नोटीफाय करण्यात आले होते. त्यामुळे एनएमएसईझेडला सोडून जाण्याचे निर्देश देण्याचे हे आणखी दुसरे कारण असल्याचे कुमार यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिलेल्या ताज्या ई – मेलमध्ये नमूद केले आहे. नॅटकनेक्ट कडून करण्यात आलेल्या ई – मेलला मुख्यमंत्री कार्यालयातून अवघ्या ३३ मिनिटांत प्रतिसाद मिळाला.

याप्रकरणात लक्ष घालण्यासंबंधीचे निर्देश वनसचिव बी वेनूगोपाळ रेड्डी आणि पर्यावरण प्रधान सचिव मनिषा म्हैसकर पाटणकर यांना देण्यात आले आहे अशी माहितीही

.../२

# राज्य सरकारला दणका, मागासवर्ग आयोगाचा अहवाल न्यायालयाने फेटाळला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंदर्भातील राज्य सरकारने सादर केलेला मागासवर्ग आयोगाचा अंतरिम अहवाल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. ठाकरे सरकारला मोठा धक्का मानला जातोय. भाजपने तर ठाकरे सरकारला ओबीसी आरक्षणविरोधी म्हटलं आहे. या सगळ्यावर ओबीसी नेते आणि ठाकरे सरकारमधील मंत्री विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होऊ नयेत अशाच मताचं राज्य सरकार आहे, मंत्रिमंडळाने तसा निर्णयदेखील घेतला आहे, असं विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं आहे.

सरकारने आरक्षणासाठी ज्या गोष्टी केल्या पाहिजेत, त्या सर्व गोष्टी ठाकरे सरकारने केल्या आहेत. सर्वोच्च न्यायलयापुढे ज्या ज्या गोष्टी मांडायला पाहिजे होत्या, त्या सर्व मांडल्या आहेत. पण शेवटी हा न्यायालयीन लढा आहे. न्यायालयाने मागितलेली सर्व माहिती सरकार म्हणून आम्ही त्यांना दिलीय. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होऊ नये, ही आमची आजही भूमिका होती आणि उद्याही राहील, असंही वडेट्टीवार म्हणाले.

ओबीसी आरक्षण घालविण्याचं पाप खरं तर भाजपने केलं आहे. पण तेच भाजप आज राज्य सरकारला या प्रकरणाला दोषी ठरवत आहे. पण मला सांगायचंय की आरक्षण जाण्यासाठी भाजपच जबाबदार आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

देशातील सहा राज्यांत ओबीसी आरक्षण संपुष्टात आलंय. त्यातही मध्य प्रदेश, बिहार, कर्नाटकमध्येही आरक्षण संपुष्टात आलंय. महाराष्ट्रातल्या ओबीसी आरक्षणासाठी भाजप ठाकरे सरकारला दोषी ठरवत आहे. मग भाजपशासित राज्यांमधल्या परिस्थितीला जबाबदार कोण? असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. न्यायालयाने मागासवर्ग आयोगाचा अहवाल फेटाळून सरकारला दणका दिल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत जोपर्यंत ओबीसी आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत निवडणुका घेणार नाही, असा एकमताने निर्णय घेण्यात आला. यै बैठकीला राज्य शासनाचे प्रमुख मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री एकनाथ शिंदे, तसंच इतरही महत्त्वाचे मंत्री उपस्थित होते. बैठकीत आगामी निवडणुका आणि ओबीसी आरक्षणाबाबत चर्चा झाली.

# जुन्या नळपाणी योजनेची जॅकवेल वाहून गेल्याच्या कामाला निधीची तातडीने मंजुरी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील नळपाणी योजना गेल्या अनेक वर्षांपासून नादुरूस्त असताना त्यांच्याकडे राज्यकर्ते व स्थानिक ग्रामपंचायतींच्या सत्ताधाऱ्यांचे सपशेल दूर्लक्ष झाल्याचे दिसून येत होते. त्यात आणखी भर म्हणून २२ जुलै २०२१ रोजी तालुक्यातील अनेक नळपाणी पुरवठा योजनांच्या जॅकवेल पुरामध्ये वाहून गेल्या आहेत. याच दिवशी पोलादपूर नगरपंचायतीच्या जुन्या नळपाणी पुरवठा योजनेच्या जॅकवेलला पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी तातडीने एक कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला असताना ग्रामीण भागातील अनेक पाणीपुरवठा योजनांचे भवितव्य पुरात वाहून गेल्याने यंदाच्या उन्ह–ाळ्यात पोलादपूरकर जनतेला पाण्यासाठी दाहिदिशा फिरविण्याची लोकप्रतिनिधींची मानसिकता स्पष्ट दिसून येत आहे. सध्यातरी ग्रामीण भागातील पुरहानीग्रस्त पाणी योजना रामभरोसे असल्याचे जाणवत आहे.



पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांच्या बाबतीत गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडण्याची विविध कारणे असून सुरू राहण्यासाठीचे एकही ठोस कारण दिसून येत नाही. स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून पोलादपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायत हद्दीतील ६६ गांवे आणि २ हजार ७०३ घरांना पाणीपुरवठा सुरू झाला आहे. कालवली येथील दोन योजनांना लोकसहभागाऐवजी लोकांनीच चालविल्यामुळे २४ तास नळपाणीपुरवठा सुरू झाला आहे. स्वदेस फाऊंडेशनने पोलादपूर तालुक्यातील साखर बौद्ध वाडी, बोरघर शेम्बेवाडी, कापडे माल वाडी, परसुले माळ वाडी, चांदके आदिवासी वाडी याठिकाणी विद्युत पुरवठ्यावर नळपाणी पुरवठा चालविण्यातील गैरसोयी लक्षात घेता सौरऊर्जेवर नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित केल्या. मात्र, गेल्या १० वर्षांपासून पोलादपूर तालुक्यातील नळपाणी योजनांची अवस्था नळपाणी योजनांच्या नावांमध्ये सातत्याने बदल होऊनही योजनांच्या दुरूस्तीचे अथवा नव्याने मंजुरीचा विषय कधीही शासनदरबारी लावण्यात आला नाही.

अलिकडेच, नगरपंचायत पोलादपूरची जुनी नळपाणी पुरवठा

.../२

# पिरकोन हायस्कुल येथे सेवानिवृत्ती कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

मार्च २०२१-२०२२ ,इयत्ता १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन व निरोप समारंभ व प्राचार्य व्हेटम. व्ही.एस यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी रयत टीकरिंग लॅबचे आमदार महेश बालदी यांनी उदघाटन केले. प्राचार्य व्हेटम व्ही एस यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम असल्याने त्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी दहागाव माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष कृष्णा पाटील, उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्यासह शिक्षक वृंद, सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## पेण नगरपरिषद, पेण
### निविदा सूचना
### सन २०२१-२२

पेण नगरपरिषद, पेण, जि.रायगड यांजकडून खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक विद्युत ठेकेदार यांजकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | पेण नगरपरिषद हद्दीतील चिंचपाडा येथील जगदंबा सोसायटी समोरील व ट्री हाऊस स्कूल कडे जाणारी पथदिव्यांची निकामी केबल बदलणे. (दुसरी फेर निविदा) | १,७९,०७३/- | १,०००/- | २००/- |
| २ | पेण नगरपरिषद कार्यालयातील ३ KVA ऑनलाईन UPS करिता बॅटरी खरेदी करणे व कार्यान्वित करून देणे. (पहिली फेर निविदा) | १,१६,५८३/- | १,०००/- | २००/- |
| ३ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणे | १६,५८३/- | ५००/- | १००/- |
| ४ | पेण नगरपरिषद मालकीचे इनडोर गेम हॉल येथील विद्युत व्यवस्था दुरुस्त करणे | १,९८,६०४/- | १,०००/- | २००/- |
| ५ | पेण नगरपरिषदेचे रस्त्यावरील दुभाजक मधील पोलचे एफ आर पी बॉक्स बदलणे | १,२८,६९४/- | १,०००/- | २००/- |
| ६ | नगरपरिषद मालकीचे ट्री कटर व गवत कापण्याचे मशिन दुरुस्त करणे | ३०,०००/- | ५००/- | १००/- |
| ७ | पेण नगरपरिषदेचे रस्त्यावरील दुभाजक मधील व तळ्याकाठच्या विद्युत पोलना रंग लावणे | १,४०,२७३/- | १,०००/- | २००/- |

कामाबाबत अटी व शर्ती :-

१) निविदा विक्रीचा कालावधी : ४/०३/२०२२ ते १४/०३/२०२२ पर्यंत पेण नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत

२) सदरच्या सिलबंद निविदा कार्यालयीन वेळेत दिनांक १५/०३/२०२२ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत सादर करता येतील.

३) सदर कामाबाबत विस्तृत माहिती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवसा खेरीज नगरपरिषद कार्यालयात विद्युत विभागात मिळेल.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

# समाजाचे विकासासाठी म्हसळा तालुका सुतार समाज संघटनेने पक्ष प्रवेशाची योग्य चौकट बांधली आहे : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळयात बारा बलुतेदारांचा सहभाग होता त्या मध्ये माझा दुग्धव्यवसाय करणाऱ्या गवळी समाजासह विश्वाचे शिल्पकार असणारे दैवत विश्वकर्मांचे सुतार समाजाचाही तेवढाच सहभाग होता. प्रत्येक समाज त्यांचे कार्यक्षेत्रात राहुन अचूकपणे काम करत असतात त्या प्रमाणे म्हसळा तालुक्यातील संपुर्ण सुतार समाज संघटनेने समाजाचा विकासात्मक परिवर्तन घडवुन आणण्यासाठी एकत्रितरीत्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून एका अर्थाने पक्ष प्रवेशाची योग्य चौकट तयार केली असल्याचे गौरवोद्गार खासदार सुनिल तटकरे यांनी मौजे खारगाव बुद्रुक येथे पक्ष प्रवेश आणि सुतार समाज सामाजिक सभागृह संरक्षणभिंत बांधकामाचे भूमिपूजन कार्यक्रमात संबोधित करताना व्यक्त केले.



ते पुढे बोलताना म्हसळा तालुक्यातील सुतार समाज संघटनेने सामाजिक विकास करून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या छत्राखाली येण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे समाधान व्यक्त करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश म्हणजे विकासाच्या कामाला सुरुवात केला असल्याचा पक्ष प्रवेश, सामाजिक भावना जपणारा पक्ष प्रवेश आणि सेवा करण्याची बांधीलकी असणारा प्रवेश असल्याचे खासदार सुनिल तटकरे तटकरे यांनी सांगितले. पक्ष प्रवेश कर्त्यांमध्ये प्रामुख्याने म्हसळा तालुका सुतार समाज संघटना अध्यक्ष दत्ता सुतार, माजी अध्यक्ष पांडुरंग सुतार, उपाध्यक्ष नामदेव घुमकर, सेक्रेटरी संदीप कार्लेकर, उपसेक्रेटरी राजु सुतार, संतोष उद्दरकर, खजिनदार संदीप सुतार, सरचिटणीस रामदास सुतार, नथुराम सुतार, सल्लागार दत्तात्रय सुतार, अशोक सुतार, दत्तात्रय उद्दरकर, यशवंत सुतार, गजानन सुतार, विलास सुतार, तुकाराम सुतार, हनुमंत सुतार आदी सुतार समाज महिला मंडळीने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. पक्ष प्रवेश कर्त्या सुतार समाज संघटनेचे खासदार सुनिल तटकरे यांनी स्वागत केले.

१० लक्ष रुपये मंजूर निधीच्या संरक्षण भिंत बांधकामाचे भूमिपूजन झाल्याचे जाहीर करून यापुढे म्हसळा तालुका सुतार समाज संघटना आणि महिला मंडळाने मागणी केलेल्या सार्वजनिक विकास कामांना प्राधान्य देण्यात येईल असे आश्वाशीत केले. यावेळी कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष समीर बनकर,जिल्हा परिषद सभापती बबन मनवे, सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदिप चाचले, माजी सभापती उज्वला सावंत, माजी सभापती महादेव पाटील, नगराध्यक्ष असहल कादरी, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे, पं.स.सदस्य मधुकर गायकर, युवक अध्यक्ष फैसल गीते, नगरसेवक नासीर मिठागरे, सरपंच अनिल बसवत, संतोष उर्फ नाना सावंत, किरण पालांडे, गजानन पाखड, महेश घोले, प्रकाश गाणेकर, महिला अध्यक्षा रेश्मा काणसे, मीना टिंगरे, अनिल टिंगरे आदि मान्यवर उपस्थित होते.

# पिंक रन मॅरेथॉन विजेत्या ऋतुजाचे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले अभिनंदन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

लडकी हूँ..लड सकती हूँ..! या मोहिमेवर आधारित मुंबई येथे झालेल्या पिंक मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम आलेल्या ऋतुजा सकपाळ (वय-२१) हिचे क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी अभिनंदन केले.

मुंबई येथे रविवार दि.२७ रोजी मरीन ड्राईव्ह येथून सुरु झालेल्या पिंक रन या ५ किमी अंतराच्या महिला विशेष मॅरेथॉन स्पर्धेत तालुका पेण येथील धावपटू ऋतुजा सकपाळ हिने अव्वल येत ही स्पर्धा अवघ्या १९.०३ मिनिटात पूर्ण केली. तिच्या या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देताना 'ऋतुजा तू लढून दाखवलंस, एक महिला म्हणून तुझा अभिमान वाटतो' या शब्दांत क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी अभिनंदन केले आहे.

## कलम वाडीतील ग्रामस्थांना थेट नळाद्वारे शुद्ध पाणी

# स्वदेस फाऊंडेशन व लोक वर्गणीतून पाणी योजनेचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सिद्धेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील कलम वाडी येथे स्वदेस फाऊंडेशन व लोकवर्गणीतून तयार केलेल्या शुद्ध नळ पाणी योजनेचा उद्घाटन सोहळा नुकताच संपन्न झाला. या योजनेमुळे कलम वाडीतील ग्रामस्थांना नळाद्वारे शुद्ध पाणी थेट घरापर्यंत मिळाले आहे.

यामुळे लोकांची पाण्याची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागली आहे. उद्घाटनावेळी सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार, सरपंच उमेश यादव, भाग्यश्री पाठारे, संतोष भोईर, स्वदेसचे दयानंद माने, उपसरपंच योगेश सुरवकर, ग्रामसेवक ए. टी. गोरड, रमेश पवार, कृष्णा वाघमारे, बबन वाघमारे, तुकाराम पवार, मंगेश यादव, गंगाराम सावंत, अंकेश पोंगडे, आशिष यादव, सतीश कदम, प्राची कदम, मनीषा पोंगड आदींसह ग्रामस्थ उपस्थितीत होते. सिद्धेश्वर कलम वाडी स्वदेस गावविकास समिती, दयानंद माने, राकेश बारस्कर, प्रवीण पाटील यांनी योजना कार्यान्वित करण्यासाठी मेहनत घेतली. तसेच नंदू पवार, तुळशीराम पवार, मालू पवार, रवींद्र यादव, सुनील पोगडे, गणेश यादव, कृष्णा वाघमारे यांनी सहकार्य केलं आणि योजना पूर्णत्वास नेली.

# मिरचीचे भाव झाले, मसाले पेक्षा तिखट

**दै.रायगड नगरी । खोपोली**

रायगड जिल्हया सह कोकणात सर्व समाजाला तिखट मसाल्यालाअधिक पसंती असल्याने संकेश्री,बॅडगी, काश्मिरी, अन्नारी, सह तिखट मिरचीला जास्त मागणी आहे.उन्हाचा तडाखा वाढल्याने अनेक जण उन्हापासून वाचण्याचा प्रयत्न करत आहे. तर दुसरीकडे या उन्हाचा फायदा घेवून मसाला बनविण्यासाठी महिलांची लगबग सुरु झाली आहे.खोपोली,कर्जत, बाजारपेठेत मसाल्याच्या मिरच्या आणि गरम मसाला घेण्यासाठी महिलांची गर्दी होऊ लागली आहे.तिखटाला मिरचीचा चांगलाच ठसका बसला असून काश्मिरी,बॅडगीमिरचीचे भाव गगनाला भिडले आहेत. यामुळे वर्षभराच्या तिखटाची तजवीज करणाऱ्या गृहिणीवर्गाला महागाईचा सामना करावा लागत आहे. परिणामी सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसली असून बाजारात बॅडगी मिरचीचा भाव ३५० ते ४०० रुपये असल्याचे दिसून आले. मसाल्याच्या दराबरोबरच मिरचीचा भावदेखील वाढला असल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे.

विवाह सोहळे तसेच सण-समारंभांच्या पार्श्वभूमीवर गृहिणींना प्रथम तिखटाची तजवीज करावी लागते. वर्षभर पुरेल इतके तिखट करताना महिलांची दमछाक होते. मात्र, यंदा मिरचीचा भाव वाढल्याने खटाला महागाईची फोडणी बसली आहे. एक नंबर बॅडगी मिरचीचा भाव ३५० ते ४०० रुपये इतका असून चवीला तिखट व लाल रंगाची बॅडगी मिरची २२० ते २५० रुपये आहे. याशिवाय मसाला करण्यासाठी मिरची बरोबर गरम मसाल्याचीही मोठी मागणी असते. वर्षभरांची तुलना करता गरम मसाल्याचे भाव देखील वाढले आहेत. दालचिनी ६०० रूपये किलो, चक्रीफुल २०० रूपये किलो, लवंग ७७५ रुपये किलो, काळीमिरी ८०० रुपये किलो नागकेशर ८५० रूपये किलो, जावित्री २२०० रुपये किलो, रामपत्री ७५० रुपये किलो,हिरवी वेळची २०००रुपये किलो,काळी वेळची १४०० किलो, त्रिफळा १९० रुपये किलो, जायफळ २४९९ रुपये किलो , जिरे २५० रुपये किलो, इंदोरी धने १५० ते २८० रूपये किलो तेजपान ७६० रूपये किलो, शाजीरे ९९० रुपये किलो, शेलम हळद १४०ते १७० रूपये किलो असे दर आहेत.

अर्जदारातर्फे वकील : ॲड.मारिया कोळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.२०/२०२२
नि.नं.८/ड

श्री.वासुदेव गोविंद माळी
रा.बालई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.गिरजाबाई दामोदर माळी हे मौजे : बालई, ता.उरण, जि.रायगड येथे दि.०९/०२/१९८६ रोजी मयत झालेल्या आहेत. कै.गिरजाबाई दामोदर माळी यांचे मालकीची व ताबेकब्जे वहिवाटीतील शेतजमीन मिळकत खालील वर्णन केलेल्या मे.न्यायालयाच्या स्थळ सिमेत आहेत.

**(मिळकत क्र.अ)**
**(मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड)**

| मौजे | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|---|---|
| चाणजे | १२३ | १ ब | ०-०८-० | ०.२५ |

**(मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड)**

| युनिट केस क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|
| ६९ | १३२ | २ | ०-०९-५ |
| २७ | १३० | ३ | ०-०४-८ |

वरील मिळकतीच्या कै.गिरजाबाई दामोदर माळी यांच्या मालकी हक्काच्या असून त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार मिळण्यास पात्र आहेत. वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी अथवा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून, पुरावा घेवून मे.न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

ॲड.अनिल सुभाष जाधव

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०४/२०२२

सौ.सरिता कान्हा नवाळे
वय : ३७, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१२५-८८ ब, चिर्ले गाव,
ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

१) ज्याअर्थी अर्जदार यांची आई कै.जयवंती कान्हा नवाळे ही दि.०२/१२/२०२१ रोजी मौजे : चिर्ले, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाली आहे. तसेच अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदारांशिवाय कै.जयवंती कान्हा नवाळे यांना कोणीही वारसदार नाहीत.

२) कै.जयवंती कान्हा नवाळे यांच्या उरण येथील एम.आय.डी.सी.मध्ये सफाई कामगार सेवा अगर कामाबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात नमुद केलेल्या सेवा अगर कामाबाबत कै.जयवंती कान्हा नवाळे यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळण्याकरिता सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

३) त्याअर्थी सदर वर दाखल अर्जास कै.जयवंती कान्हा नवाळे यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ०३/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# सेझविरोधात पाणजे पाणथळ छोडो आंदोलन

कुमार यांनी दिली आहे. नाटकनेक्टने पांजे पाणथळ क्षेत्राला संरक्षण देण्याविषयी केलेल्या विनंतीबाबत कोणत्याप्रकारची हालचाल केली याविषयीची विचारणा केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान नियंत्रण (एमओईएफसीसी)ने महाराष्ट्र पाणथळ प्राधिकरणाकडे यापूर्वीच केली आहे.

सीआरझेड १ हे पाणथळ क्षेत्र असल्याचे उघड आहे आणि सिडकोने पाणजे पाणथळ क्षेत्र चुकीच्या पद्धतीने एनएमएसईझेडकडे सुपूर्द केले आहे. त्याचप्रमाणे २८९ हेक्टर क्षेत्र म्हणजे सेक्टर १६ ते २८ चा समावेश द्रोणगिरी डेव्हलपमेंट प्लानमध्ये करण्यात आल्याचे श्री एकविरा आई प्रतिष्ठानचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी सांगितले.

राष्ट्रीय पाणथळ समिती, राज्य पाणथळ प्राधिकरण, महाराष्ट्र, एमसीझेडएमए आणि रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी पाणजे पाणथळ क्षेत्राच्या संरक्षण, संवर्धन आणि व्यवस्थापनाची सर्व आवश्यक ती पावले उचलण्याचा आदेश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पश्चिम पिठाकडून काढण्यात आला आहे.राष्ट्रीय पाणथळ समिती, राज्य पाणथळ प्राधिकरण आणि महाराष्ट्र सीझेडएमए व्यतिरिक्त राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने जिल्हाधिकाऱ्यांना अनुपालनाचे निर्देश ईमेल केले आहेत. हे सर्व असतांना एनएमएसईझेड विरोधात पाणजे छोडो आंदोलन सुरू केले आहे

# जुन्या नळपाणी योजनेची जॅकवेल वाहून गेल्याच्या कामाला निधीची तातडीने मंजुरी

योजनेची जॅकवेल पुरामध्ये वाहून गेल्यानंतर रायगडच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी तातडीने मुख्याधिकारी पोलादपूर नगरपंचायत यांना १ कोटीचा निधी उपलब्ध करून देत असल्याचे कळवून तातडीने कार्यवाहीदेखील केली. यानंतर माजी राजिप उपाध्यक्ष ॲड.आस्वाद पाटील यांनी अतिवृष्टीमध्ये ज्याप्रमाणे रस्ते वाहून गेल्यानंतर दुरूस्तीसाठी निधी राखून ठेवला जातो त्याचप्रमाणे रायगड जिल्हा परिषदेने जॅकवेल आणि नळपाणी योजनांच्या दुरूस्तीसाठीही निधी राखून ठेवण्याची आवश्यकता या अतिवृष्टीमुळे स्पष्ट झाल्याचे बोरावळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील घागरकोंड येथे सांगितले. मात्र, पूरहानीमधील नळपाणी योजनांचे २२ जुलै २०२२ रोजी मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनदेखील निधीची उपलब्धता करून देण्याची गरज असताना नगरपंचायत पोलादपूर या एकमेव वाहून गेलेल्या जॅकवेलला मंजूर केलेले १ कोटी या विषयावर मुख्यमंत्री आमचे, नगरविकास खाते आमचे आणि पाणीपुरवठा खातेही आमचे आणि महाड पोलादपूरचे आमदारही आम्हीच तर १ कोटी आणण्याचे श्रेय अन्य कोणी घेऊ नये, अशी भाषा नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारादरम्यान झाली. यामुळे पोलादपूर तालुक्यातील पूरहानी कार्यक्रमामध्ये नळपाणी योजनांच्या तसेच जॅकवेलच्या दुरूस्तीचा खर्च मंजूर होण्यामध्ये अद्याप कोणासही स्वारस्य दिसून येत नाही. परिणामी, आगामी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचे गडद सावट पोलादपूर तालुक्याच्या ग्रामीण भागावर दिसून येत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादीत घर मिळकतींचे मोबदल्यात शासनाच्या पुनःर्वसन व पुनःस्थापना योजनेनुसार १) कै.विनायक आल्या घरत २) श्री.मदन विनायक घरत ३) श्रीमती.बेबीबाई विनायक घरत ४) श्री.अनंता विनायक घरत ५) सौ.भारती अनंता घरत रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ यांस सिडकोकडून खालील घर मिळकतीचे मोबदल्यात **मौजे : पुष्पक (उलवे) येथे भूखंड क्र.३६९ सेक्टर २४ क्षेत्र ३४० चौ.मी.** भूखंड देण्यात आलेला आहे.

**घर मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | युनिट केस क्र. | सर्वेक्षण क्र. | घर क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | उलवे | ULV-ICIG-63 | UL-149 TO UL-154 | ६५ अ/१, ६५/२, ६५ब, ६५ब/१, ६६ |

वरील भुधारकांपैकी कै.विनायक आल्या घरत हे दि.१०/११/२०१९ रोजी मयत झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात कायदेशीर वारस म्हणून दिवाणी न्यायालय पनवेल यांनी दि.चौ.अर्ज क्र.२१५/२०२१ या वारसदाखल्यानुसार १) श्रीमती.बेबीबाई विनायक घरत २) श्री.अनंता विनायक घरत ३) श्री.मदन विनायक घरत यांचे नावाची नोंद करण्यात आलेली आहे. परंतु श्रीमती.बेबीबाई विनायक घरत ह्या सदर भूखंडातील त्यांचा हिस्सा हक्कसोडपत्राने कायमस्वरुपी त्यांची मुले श्री.अनंता विनायक घरत व श्री.मदन विनायक घरत यांचे लाभांत करणार आहेत. व तसा दस्त दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल यांचेकडे नोंदणीकृत करणार आहेत.

तरी सदर मिळकतीचे हक्कसोडपत्राबाबत हरकत असल्यास व त्यामधील कोणत्याही भागावर कोणाचा गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, जप्ती, कुळवहिवाट, विश्वस्त, वारसाहक्क, ताबा, देखभाल, साठेकरार, बयाणा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला हक्क, हितसंबंध व अधिकाराचे लेखी पुरावे व कागदपत्रांसहीत आपल्या हक्काचे स्वरुप विषद करून खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाचीही काही हरकत, तक्रार व दावा वगैरे न आल्यास सदरहू भूखंड मिळकती मधील वारसांचे अधिकार निर्वेध व बोजारहीत आहेत, असे समजण्यात येईल व सदर दस्तास कोणाचीही हरकत व तक्रार नाही असे समजण्यात येईल व त्या अनुषंगाने माझे अशिल हक्कसोडपत्र नोंदवून घेतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारी रद्दबातल समजून त्यांचा विचार केला जाणार नाही.

दि.०३/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रशांत मनोहर भोईर**
**मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.९९६७३४३६९७/८६५५५३०७७७**

## जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात
On Admission
आरटीएस अपिल क्र..../२०२२

कै.विठ्ठल श्रीपत भोसले (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.रत्नप्रभा विठ्ठल भोसले
२) श्री.विकास विठ्ठल भोसले
३) कै.नितीन विठ्ठल भोसले (मयत) तर्फे वारस
३/१) निकिता नितीन भोसले अ.पा.क.
श्रीमती.रत्नप्रभा विठ्ठल भोसले
सर्व रा.एच-१०, सेक्टर नं.८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल — वादी
विरुद्ध
१) सौ.अर्चना राजगोपाळ नागेजा
रा.३०, दुसरा मजला, दिप्ती सोसायटी, मिठ बंदर रोड, ठाणे
२) कै.पदू कृष्णा पाटील (मयत) तर्फे वारस
२/१) कै.केशव पदू पाटील
२/१/१) श्रीमती.अक्काबाई केशव पाटील
२/१/२) श्री.सुभाष केशव पाटील
२/१/३) श्री.जगदीश केशव पाटील
२/१/४) कु.सुवर्णा केशव पाटील
२/१/१ ते २/१/४ रा.वलप, ता.पनवेल
२/१/५) सौ.शारदा जगन्नाथ म्हात्रे
रा.जुने कामोठे गाव, म्हात्रे आळी, कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.११९० विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.१७/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३१ | ० | ०.२०.० | ०.५३ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०२/२०२२

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सोन्याचे दागिने खेचून पळणारा सराईत गुन्हेगार गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर परिसरात तसेच खांदा वसाहत परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने खेचून पळणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गेल्या काही दिवसापासून पनवेल शहर परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने खेचून पळून जाणाऱ्या इसमाचे गुन्हे वाढले होते. या संदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि विजय कादबाने व पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे विभागाचे सहा.पो.नि.दळवी, पो.उप.निरीक्षक आकाश शिंदे, पो.हवा. राऊत, परेश म्हात्रे, वायकर, पारासुर, गंथडे, वाघमारे, महेश पाटील, मिसाळ, भगवान साळुंके, देशमुख, घरत आदींच्या पथकाने या संदर्भात त्या भागातील सीसीटीव्ही फुटेज व गुप्तबातमीदार यांच्याकडून माहिती घेवून सदर आरोपीचा शोध करीत असताना दिलेल्या वर्णनाचा आरोपी हा एस.टी.स्टॅण्ड परिसरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने आल्याची माहिती या पथकाला मिळताच त्यांनी सापळा रचून आरोपी आकाश घाडी (२५ रा.विचुंबे) याला ताब्यात घेतले आहे व त्याच्याकडून आतापर्यंत ४ गुन्हे उघडकीस आाले आहेत. त्याच्या अटकेमुळे अजूनही चेन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## माझी वसुंधरा अभियानांतर्गत किहीम समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली व अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे आणि अलिबाग तहसिलदार श्रीम. मीनल दळवी यांच्या पुढाकारातून दि.२७ फेब्रुवारी २०२२ रोजी माझी वसुंधरा अभियान अंतर्गत अलिबाग तालुक्यातील मौजे किहीम येथील समुद्र किनारा स्वच्छता मोहीम संपन्न झाली. या मोहिमेत किहीम गावातील प्रतिष्ठीत नागरीक, ग्रामपंचायत कर्मचारी, महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच माणुसकी प्रतिष्ठानचे डॉ.राजाराम हुलवान व सदस्य, अलिबाग रोटरी क्लबचे सदस्य सहभागी झाले होते. विशेष म्हणजे किहीम समुद्र किनाऱ्यावर आलेल्या पर्यटकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून या स्वच्छता मोहिमेत आपले योगदान दिले असून ही मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी किहीमचे मंडळ अधिकारी पाटील यांच्यासह तलाठी शिंगाडे, इग्रुळकर, हांगे, घुमरे तसेच कोतवाल, पोलीस पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.




## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१९४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

१) श्री.दत्तात्रय पोपट भोसले
वय : ४०, व्यवसाय : नोकरी
रा.टॉवर-४, रुम नं.९०२, न्यू
सातारा को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट-अ/२४ इ,
सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०
२) श्रीमती.जया पोपट भोसले
वय : ६५, व्यवसाय : गृहिणी
रा.भैरवनाथ मंदिराजवळ जेऊर, पुणे महाराष्ट्र-४१२३०५
३) श्रीमती.राजेश्री जालिंदर कांबळे
वय : ४३, व्यवसाय : गृहिणी
रा.कवडेवाडी, पिंगोरी, पुणे, महाराष्ट्र ४१२३०५ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.पोपट गेनबा भोसले यांचे निधन दि.२१/०९/२०२१ रोजी मु.पो.जेऊर, ता.पुरंदर, जि.पुणे येथे झाले आणि अर्जदार १) श्री.दत्तात्रय पोपट भोसले, वय : ४०, व्यवसाय : नोकरी, राहणार : रुम नं.९०२, न्यू सातारा को.ऑ.हौ.सो.लि., टॉवर-०४, प्लॉट-अ/२४ इ, सेक्टर-१२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०, २) श्रीमती.जया पोपट भोसले, वय : ६५, रा.भैरवनाथ मंदिराजवळ जेऊर, पुणे महाराष्ट्र-४१२३०५ व ३) श्रीमती.राजेश्री जालिंदर कांबळे वय : ४३, रा.कवडेवाडी, पिंगोरी, पुणे, महाराष्ट्र ४१२३०५ यांनी या कोर्टात सदर मयत कै.पोपट गेनबा भोसले यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**(कार्पेट क्षेत्रफळ ५८ चौ.मी.) टॉवर-०४, रुम नं.९०२, न्यू सातारा को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट-अ/२४ इ, सेक्टर-१२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**

कै.पोपट गेनबा भोसले यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# पाली बसस्थानक इमारत पुनर्बांधणीचे काम खोळंबले

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पालीत बसस्थानक हे देखणे व सुसज्ज असणे अपेक्षित होते. मात्र प्रदीर्घ प्रतीक्षा व पाठपुराव्याने मंजूर झालेले बसस्थानक आजही रखडले असल्याचे समोर आले आहे. पालीतील जीर्ण आणि जर्जर झालेल्या बस स्थानकाची इमारत जवळपास वर्षभरापूर्वी पाडण्यात आली आहे. मात्र त्या ठिकाणी नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीस व नूतनीकरणास अजूनही सुरुवात झालेली नाही. येथे जणूकाही खंडर झाले आहे. इमारत बांधणी व स्थानकात नुतनीकरण कामांसाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र ठेकेदाराला चालु वाढीव दर हवे असल्याने काम खोळंबले आहे. अशी माहिती सूत्रांनी दिली. परिवहन महामंडळाचे नवीन इमारतीच्या पुनर्बांधणी कडे दुर्लक्ष असल्याचे देखील समोर आलंय.

पाली बसस्थानकाची जुनी इमारत पाडली खरी मात्र जुन्या इमारतीचा राडारोडा येथे तसाच ठेवण्यात आलेला आहे. बाजूला तात्पुरता स्वरूपात प्रवाशी व कर्मचारी शेड बांधण्यात आली आहे. मात्र परिपूर्ण बस स्थानक इमारती अभावी प्रवासी व परिवहन कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे. अनेक वर्षे धोकादायक स्थितीतल्या बस स्थानकाची इमारत तोडून त्याठिकाणी नवीन इमारत उभी रहावी यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वारंवार राज्य परिवहन महामंडळाकडे मागणी करण्यात येत होती. यासाठी सामाजिक कार्यकर्ते, नागरिकांकडून उपोषणे व आंदोलने देखील करण्यात आली. २०१६ मध्ये रिपाइं रायगड जिल्हा सचिव रवींद्रनाथ यांनी नवीन बस स्थानकाकरिता आमरण उपोषण केले. यावेळी त्यांच्या उपोषणाला व नागरिकांच्या मागणीला यश आले आणि पाली बस स्थानकाच्या नवीन इमारतीकरिता राज्य परिवहन महामंडळाकडून निधी उपलब्ध करण्यात आला. परंतु काही वर्षे जाऊन सुद्धा परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाच्या पुनर्बांधणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. दरम्यान रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी पुन्हा मागील वर्षी मार्च महिन्यात पाच दिवस उपोषण केल्यानंतर नवीन इमारत बांधण्यासाठी परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाची धोकादायक इमारत जमीनदोस्त करण्यात आली. परंतु वर्ष उलटून गेले तरी परिवहन महामंडळ नवीन इमारतीच्या पुनर्बांधणी कडे कानाडोळा करतांना दिसत आहे. ठेकेदाराला भाव-वाढ देण्यासाठी प्रस्ताव पाठवल्यास, किंवा ठेकेदार बदलल्यास आणि वाढीव दरासाठी नवीन निविदा काढली तर या सर्व प्रक्रियेला खूप उशीर होईल. आणि प्रत्यक्षात स्थानक पुनर्बांधणी काम सुरू होण्यास ७ ते ८ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी जाण्याची शक्यता आहे.नवीन बस स्थानक नुतनीकरणासाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी नोव्हेंबर-डिसेंबर २०१९ मध्ये मंजूर झाला होता. यामध्ये नवीन सुसज्ज भव्य इमारतीसह विविध सुविधा आदींचा समावेश होता. तसेच इमारतीच्या प्रत्यक्ष बांधकामास जानेवारी २०२० पासून सुरुवात होणार होती. मात्र ३ वर्ष उलटूनही अजून एक वीट सुद्धा बसविण्यात आलेली नाही. चालू दराप्रमाणे आता ही रक्कम ३ कोटी होण्याची शक्यता आहे.


## पनवेल महानगरपालिका

**जाहीर ई-निविदा सुचना क्र.०२ (द्वितीय वेळ)**

**सन २०२१-२२**

**जावक क्र.पमपा/पर्यावरण/३९२२/प्र.क्र.७/२१/२०२२**
**दिनांक : ०३/०३/२०२२**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात माझी वसुंधरा अभियानाची अंमलबजावणीसाठी त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत कामाची अंदाजित किंमत सुमारे रक्कम रु.१३,००,०००/- मात्र अपेक्षित आहे. ई-निविदा सादर करणेची मुदत दि.१४/०३/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
(तृप्ती सांडभोर)
अति.आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका


मा.रावसाहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील श्री.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२६३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१/१) श्रीमती.विठाबाई पदू पाटील, वय : ७३ वर्षे
१/२) श्री.गजानन पदू पाटील, वय : ५९ वर्षे
१/३) श्री.पांडुरंग पदू पाटील, वय : ४५ वर्षे
१/४) श्री.रतन पदू पाटील, वय : ४३ वर्षे
१/५अ) श्री.राकेश राजेश पाटील, वय : ३० वर्षे
२/१) श्री.विठ्ठल नारायण पाटील, वय : ५३ वर्षे
३) श्री.भगवान सदू पाटील, वय : ७६ वर्षे,
सर्व रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.सदू रामजी पाटील हे दि.२५/०७/१९८५ रोजी मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून, त्यांची पत्नी बयाबाई सदू पाटील ही मयत आहे. त्यांचा मुलगा पदू सदू पाटील हे दि.२६/११/२०१२ रोजी मयत झाले आहेत. तसेच राजेश पदू पाटील हे दि.०५/१०/२००८ रोजी मयत झाले आहेत. सुलोचना राजेश पाटील या ०८/११/२००६ रोजी मयत झाल्या आहेत. नारायण सदू पाटील हे दि.२९/०८/२०१८ रोजी मयत झाले आहेत. त्यांची पत्नी माई नारायण पाटील या दि.२८/०८/२००९ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| कळंबोली-७२ | ३९ | १ | ०-१७-४ |
| | ३९ | ४ | ०-०८-८ |
| | ३९ | ९+१०+११अ | ०-४५-५ |
| कळंबोली-७२ | ४७ | ७ अ | ०-०६-२ |
| | ४१ | ६ | ०-३५-५ |
| कळंबोली-७२ | १८ | १ | ०-१३-४ |
| कळंबोली-७२ | ४१ | १६ | ०-०१-३ |
| | ४१ | १७ ब | ०-०४-१ |
| | ४४ | क | ०-०१-० |
| | १२३ | ३ पै | ०-०७-४ |
| कळंबोली-७२ अ | ७५ | ६ | ०-२९-८ |
| | ५ | १३४ | ०-२४-८ |
| | ६ | १३५ | ०-३१-० |
| कळंबोली-७२ अ | ४५ | ४+५+९+७ | ०-४५-८ |
| कळंबोली-७२ ब | ५७ | १ पै | ०-१७-१ |
| कळंबोली-७२ ब | ६० | १ ब | ०-१८-२ |
| | ६६ | २ | ०-२५-९ |
| कळंबोली-७२ क | ५२ | ७ | ०-२१-७ |
| कळंबोली-७२ क | ७७ | १ | ०-५१-४ |
| कळंबोली-१६७ | २५ | ३ अ | ०-४४-६ |
| | २५ | ३ ब | ०-२६-८ |
| कळंबोली-४२ | ४० | ६ अ | ०-११-४ |
| कळंबोली-२३ | ७५ | ७ | ०-२१-५ |

अर्जदार हे कै.सदू रामजी पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.३/३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

## गळ्यातील मंगळसूत्र खेचले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा फेस टू येथील सुनीता सुभाष शिंदे ह्या कारने डोंबिवली येथे धार्मिक कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. कार्यक्रम संपल्यानंतर त्या नावडे फाटा येथे उतरल्या. रस्ता पास करण्यासाठी थांबलेले असताना दुचाकीवर आलेल्या दोन ईसमानी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून नेले.

गोडसे साहेब

अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०३/२०२२

१) श्री.दिनेश मधुसूदन पाटील
वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.विजयनगर, सी-१०४, माऊली हौ.सोसायटी,
पहिला मजला, कामठा, ता.उरण, जि.रायगड
२) श्री.देवेंद्र मधुसूदन पाटील
वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.गणपती मंदिराजवळ, घर क्र.७८,
मु.पो.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
३) कु.स्वरा विनेश पाटील
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.सुरभी विनेश पाटील
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
(अर्जदार क्र.१ स्वतःकरिता व अर्जदार क्र.
३ व ४ यांचे अ.पा.क. काका म्हणून)
३ व ४ रा.रुम नं.१५, गोविंद सुधा आळी,
मु.पो.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.भारती प्रमोद पाटील
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रत्नेश्वरी मंदिराजवळ, घर क्र.५३१,
मु.जसखार, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ व २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून अर्जदार क्र.५ ही त्यांची विवाहित बहिण आहे. तसेच अर्जदार क्र.३ व ४ ही अर्जदार क्र.१, २ आणि ५ यांचा मयत भाऊ विनेश मधुसूदन पाटील यांची मुले आहेत. सदर अर्जदार क्र.१, २ व ५ यांची आई म्हणजेच अर्जदार क्र.३ व ४ यांची आजी पार्वती मधुसूदन पाटील या दि.१३/१२/२०२१ रोजी मौजे : बोकडविरा, ता.उरण येथे मयत झाल्या आहेत. मयत पार्वती मधुसूदन पाटील यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकती आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मु.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | बोकडविरा १६०/८७ | ११६ | ६ | ०-०२-३ | ०=१९ |
| | | ३ | ९ | ०-०३-० | ०=१६ |
| | | ३६ | ३ | ०-१५-७ | १=१९ |
| | | ११६ | ४ | ०-०६-८ | ०=४४ |
| | | १२६ | २१ | ०-०५-४ | ०=४५ |
| | | १६६ | ५ | ०-१०-६ | ०=९१ |
| २ | बोकडविरा ३४/८७ | १६ | ४ | ०-३-५ | ०-१९ |
| | | ३१ | ४ | ०-८-८ | ०-७८ |
| | | २६ | १ | ०-१५-० | १-३१ |
| | | ५८ | ७ | ०-१९-० | १-६९ |
| | | ९७ | ४ | ०-११-९ | १-१२ |
| | | ९७ | ६ | ०-१४-४ | १-०६ |
| | | ९९ | २ | ०-११-६ | १-०६ |
| | | ९९ | ३ | ०-११-७ | १-०६ |
| | | ९९ | ७ | ०-४६-४ | ३-०७ |
| | | १०५ | ५ ब | ०-०८-१ | ०-५६ |
| | | १२१ | १७ | ०-०४-८ | ०-३६ |
| | | १०२ | ४ | ०-०८-१ | ०-६२ |

तसेच पार्वती कै.मधुसूदन पाटील यांच्या सामाईक नावे मौजे : धसाखोशी, ता.उरण येथे सर्व्हे क्र.७०/३/ब, क्षेत्र-०हे-१४ आर.०० पॉ., आकार-२ रु.५० पैसे ही जमीन मिळकत देखील आहे.

वर नमूद संपादीत मिळकत तसेच सदर मिळकतीच्या संपादनापोटी मिळणारे विविध लाभ अर्जदारांस मिळण्याकरिता अर्जदारांनी ते त्यांनी ते पार्वती मधुसूदन पाटील यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०२ माहे मार्च सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

## स्व. बाबु हाशा पाटील स्मृती चषकाचा मानकरी आकुर्ली संघ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्व. बाबु हाशा पाटील (बामणडोंगरी) स्मृती प्रित्यर्थ स्व. बाबु हाशा पाटील कला, क्रिडा प्रतिष्ठान व जय हनुमान क्रिकेट संघ भोकरपाडा यांनी आठव्या वर्षी भोकरपाडा येथे तीन दिवशीय क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये प्रथम क्रमांक सिध्दार्थ इलेव्हन आकुर्ली, द्वितीय क्रमांक जीतु इलेव्हन जय हनुमान नेरे, तर तृतीय क्रमांक जय हनुमान भोकरपाडा संघाने पटकाविला. यांना रोख रक्कम व भव्य चषक देण्यात आले. मालिकावीर म्हणून आकुर्ली संघाचा नितीन धर्णेकर याला घरघंटी देवून सन्मानित करण्यात आले. बक्षिस वितरण अर्जुन गरड (वपोनि सिबीडी), पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, आकुर्ली सरपंच सचिन पाटील, चिपळे उपसरपंच मंगेश फडके यांच्या हस्ते करण्यात आले. माधव पाटील यांनी या स्पर्धेसाठी सहकार्य करणा-या ज्ञान अज्ञात मंडळींचे आभार मानले.



ॲड.जी.एस.पाटील
ॲड.अभिजीत मां. पाटील

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ/कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२२/२०२२
नि.नं.७/ड

१) श्रीमती.सोनाली अभिषेक म्हात्रे
२) कु.शोर्य अभिषेक म्हात्रे
अ.नं.१ ते २ सध्या रा.कल्पतरु रिव्हरसाईड
गोदावरी बिल्डींग १, विंग बी, प्लॅट नं.११३-११४,
११ वा माळा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
मुळ पत्ता : मु.पो.डोलवी, ता.पेण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

सौ.कांचना अमृत म्हात्रे
रा.मु.पो.डोलवी, ता.पेण, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार नं.१ यांचे पती आणि अर्जदार नं.२ यांचे वडील कै.अभिषेक अमृत म्हात्रे हे दि.१८/१०/२०२१ रोजी सब डिस्ट्रीक्ट हॉस्पिटल पेण, ता.पेण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. वरील मयत व्यक्ती कै.अभिषेक अमृत म्हात्रे यांच्या मृत्यूसमयी नावांची नोंद असलेल्या व त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार यांचा कायदेशीर हिस्सा असलेल्या जंगम मिळकती ह्या स्वयंसंपादीत आणि स्वकष्टार्जित मिळकती असून त्या त्यांच्या कमाईच्या आहेत. त्यांची महाराष्ट्र शासनाचे व्हेईकल डिपार्टमेंट पेण-रायगड आणि ठाणे येथे नोंदणी झालेली आहे. तसेच परिशिष्ट ब मध्ये नमूद गोपिनाथ पाटील पारसिक जनता सहकारी बँक शाखा-वडखळ, ता.पेण, जि.रायगड यांचेकडील करंट खाते आणि परिशिष्ट क मध्ये नमूद कोटक लाईफ इन्शुरन्स पॉलिसी अशा मिळकती असून सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**परिशिष्ट अ**
**वाहन मिळकतीचे वर्णन** (Property Discription)

| Sr. No. | Ragister No. | Engine No. | Chassis No. | Vechicle Class & Model | Vechicle Value |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH-04 HS1549 | B591803261 L63560880 | MAT448059 G2P26013 | LPK2518TCX4 BS3 TIPPER | 4,00,000/- |
| 2 | MH-06 BW8144 | 400952D00 69576 | MEC2626C HJPO69816 | Goods Carrier Bharat Benz 4023TT 4X2BSIV-2 | 7,00,000/- |
| 3 | MH-06 AQ9032 | OIE6401K 62937726 | MAT503010 A3K19373 | Goods Carrier Tata Motors | 5,00,000/- |
| 4 | MH-43 U2885 | 80C626580 86 | 415206CRZ 303683 | Goods Carrier LPS3516TC | 5,00,000/- |
| 5 | MH-04 GC6411 | 31C841017 15 | MBYBC00 93DDA305 | Goods Carrier311 6HLBSIII | 4,00,000/- |
| 6 | MH-06 AC3017 | 60C624668 44 | 415206DTZ 207524 | Goods Carrier LPS3516TC | 5,00,000/- |
| 7 | MH-06 BW8444 | JFPZ116118 | MBITLKH DOJPFC7589 | Articulated Vechicle Q3518TTBS4 | 5,00,000/- |
| 8 | MH-06 BW2496 | JFPZ116118 | MBIHTLHD 3JRAY9140 | Goods Carrier U2518BS4 | 4,00,000/- |
| 9 | MH-46 H0717 | 6BTAA160H POIH62913508 | MAT415206A 3H14297 | Articulated Vechicle | 5,00,000/- |
| 10 | MH-06 BW8344 | B591803121 B63233583 | MAT503010C 1B04107 | LPS3518TCBS3E RGOWABCO Good Carrier LPS3518 | 5,00,000/- |
| 11 | MH-06 AQ9031 | OIE6401K6 2937397 | MAT503010A 3K19355 | Articulated Vechicle TATA3518 | 5,00,000/- |
| 12 | NL01 Q-2091 | 61F8431 XXXX | MC2K5ERCO GFOOXXXX | EICHER 40 40 RHD | 4,00,000/- |

**परिशिष्ट ब**
**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | बँकेचे नाव/पत्ता | आय.एफ.सी.नं. | बचत/चालू खाते क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | गोपीनाथ पारसिक सहकारी बँक-वडखळ शाखा-वडखळ, ता.पेण, जि.रायगड | PJSB0000053 | ०२३/२४५ | रुपये |

**परिशिष्ट क**
**मिळकतीचे वर्णन**

| इन्शुरन्स कंपनीचे नाव | युन्युक्यू आयडेंटीफिकेशन नं. | बेसिक सम ॲश्युअर्ड |
|---|---|---|
| कोटक लाईफ इन्शुरन्स | 107NO81V01 | ८,५८,७६४/- |

येणेप्रमाणे वाहन मिळकती, बँक खाती व इन्शुरन्स पॉलिसी अशा जंगम मिळकती आहेत. वरील मिळकतीपैकी परिशिष्ट अ मधील मिळकत क्र.१ ते ४ आणि ६ ते १२ ह्या वाहन मिळकती महाराष्ट्र शासनाचे व्हेईकल डिपार्टमेंट पेण-रायगड येथे आणि मिळकत क्र.५ ठाणे आर.आी.ओ. येथे नोंदणीकृत आहेत. तसेच परिशिष्ट ब मधील बँक खाती सोलप्रोप्रायटर म्हणून आणि परिशिष्ट क मधील इन्शुरन्स पॉलिसी इत्यादी मयत कै.अभिषेक अमृत म्हात्रे यांचे नावे असून त्यांच्या पश्चात वर नमूद सर्व मिळकती ह्या अर्जदार यांचे नांवे होणेकरिता आवश्यक तो लागणारा वारसदाखला त्यांचे हिश्यापुरता मिळावा म्हणून वरील अर्जदार यांनी या न्यायालयात सदरचा चौकशी अर्ज इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ कलम ३७२ अन्वये दाखल केलेला आहे. त्यांची वारसनोंद होणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याअर्थी अर्जदारांचे मागणीप्रमाणे त्यांना वारसदाखला देणेस कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास संबंधितांनी स्वतः अगर वकीलमार्फत या न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत हजर राहून आपले म्हणणे, हरकत अगर साक्षीपुरावे द्यावेत. अन्यथा योग्य त्या चौकशीअंती अर्जदारांनी त्यांचे कथन सिद्ध केल्यास त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना वारसदाखला देण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आज दि.०३ माहे ०३ सन २०२२ रोजी माझे सहीने आणि कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, अलिबाग

# संक्षिप्त...

## शासनाच्या आदिवासी उत्थान कार्यक्रमांतर्गत शिघ्रे येथे आरोग्य शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड तालुक्यातील शिघ्रे आदिवासीवाडी येथे आदिवासी उत्थान कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते .

तहसीलदार रोहन शिंदे, महसूल नायब तहसीलदार गो–विंद कोटंबे, सरपंच संतोष पाटील,मंडळ अधिकारी खुशाल राठोड, तलाठी रुपेश रेवसकर (मुरुड), रेश्मा विरकुड (वावडुंगी), सपना बागडे (सावली), ग्रामसेवक विराज माळी, संदीप खोत, सचीन हिरवे, प्रकाश तिवरे तसेच आरोग्य विभागातील तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजीव दुबे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हडबे, आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विकासिनी चव्हाण, आरोग्य उपकेंद्र शिघ्रे येथील डॉ.फैजान मिस्त्री, डॉ.जस्मिन धनसे, आरोग्य सहाय्यक संतोष नागावकर, आरोग्य सेवक सुरेश बैकर,संध्या चव्हाण, रश्मी पाटील, उज्वला दवटे तसेच तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील राजेंद्र चुनेकर, गणेश शिंदे, दत्तात्रेय गोंजी,शालिकराव पावरा, मयुरी कदम, संकेत घरत, विशाल माळी, ग्रामीण रुग्णालयातील अधिपरिचारिका बायसा साकोरे, श्रुतिका कांबळे, सचीन जाधव, समीर धांडुरे, दिपेश गुरव, स्नेहल विरकुड, उन्नती कचरेकर, आशावर्कर रेश्मा माळी, निकिता गायकर तसेच अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ विशेष करून महिला उपस्थित होत्या. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन तहसीलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हडबे, आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विकासिनी चव्हाण, डॉ.फैजान मिस्त्री डॉ.जस्मिन धनसे व त्यांच्या टिमने परीसरातील आदिवासी बांधवांची वैद्यकीय तपासणी करून रोगनिदान करण्यासाठी रक्त–थुंकी नमुने घेण्यात आले.यावेळी त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

## दोन लाख ६७ हजार रुपयांचे घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

धानसर येथे वर्कशॉपच्या मुख्य प्रवेशदाराचे कुलूप तोडून चोरट्यांनी दोन लाख ६७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.

भांडुप, कांजूरमार्ग येथील मदन गुंजाळ यांचा श्रेया इंटरप्रायजेस, धानसर येथे फॅब्रिकेशन वर्कशॉप आहे. त्यांच्या वर्कशॉपचे कुलूप तोडून चोरट्यांनी लोखंडी बीम, स्टील प्लेट असा दोन लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खोपोली प्रशासन नागरिकांच्या मरणाची वाट पाहतंय?

## मुकुंदनगर वासियांना भेटायला मुख्याधिकारी यांच्याकडे वेळच नाही?

**दै.रायगड नगरी । खोपोली**

गेल्या दोन दिवसांपासून महिला, युवकांना सोबत घेवून मुकुंदनगरवासी अधिकृत रस्त्यांसाठी आमरण उपोषण करीत आहेत. पण खोपोली नगर परिषद प्रशासनाला नागरिकांच्या जीवाची काळजी नसल्याने दोन दिवसांत खोपोली नगर परिषदेचे प्रशासक मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी आंदोलनकर्त्यांकडे साधे ढुंकूनही पाहिलेले नाही. उपोषणकर्त्यांपैकी अनेकांची प्रकृती ढासळली आहे, पण 'काल मरणार असाल तर आज मरा', आम्ही रस्ता देणार नाही? अशीच भुमिका खोपोली नगर परिषद प्रशासनाने घेतली असल्याचे उपोषण कर्त्यांकडून बोलले जात आहे.



गेल्या २० वर्षापासून सर्वे नंबर ८ व हिस्सा नंबर २ सिटीएस नं.५३४८ मधून राहत्या जागेत येण्या–जाण्यासाठी अधिकृत रस्ता नाही. अधिकृत रस्ता मिळण्यासाठी मुकुंद नगर वासियांनी खोपोली परिषदेकडे वारंवार पाठपुरावा केला आहे, मात्र त्यांना रस्ता मिळाला नाही. दरम्यान, नगराध्यक्ष सुमनताई औसरमल, जेष्ठ नगरसेवक मोहन औसरमल, तत्कालीन मुख्याधिकारी गणेश शेट्ये यांनी खाजगी जा–गेतून सिलेंडर वाहन, ॲम्बुलन्स व शाळा बस, रिक्षा जाण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती. रस्ता देतानाच अटी व शर्थी घालण्यात आल्या होत्या. तसेच अटींचे उल्लंघन केल्यास रस्ता बंद करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. दरम्यान, हा खासगी जागेतील रस्ता बंद करण्यात आल्याने हक्काचा व कायमस्वरूपी रस्ता मिळावा, यासाठी मुकुंद नगरवासी मागील अनेक महिन्यांपासून खालापूर तहसीलदार अय्युब तांबोळी व मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्या हस्ते पाठपुरावा केला आहे. पण वारंवार अर्ज व निवेदन देवूनही हक्काचा रस्ता मिळत नसल्याने शेवटी दि. २ मार्च २०२२ रोजी खोपोली नगर परिषदेसमोर उपोषण सुरू केले आहे.

मागील काही महिन्यांपासून तर दररोज कुणी ना कुणी उपोषण करीत आहे, पण या उपोषणांनी खोपोली नगर परिषद प्रशासनाला कोणताच फरक पडत नसल्याचे दिसून येत आहे. मागील दोन दिवसांपासून मुकुंदनगरवासी अधिकृत रस्त्यांसाठी आमरण उपोषण करीत आहेत, पण खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी या उपोषण कर्त्यांना भेटायला आलेले नाहीत. त्यामुळे उपोषणकर्त्यांपैकी एखाद्याचा जीव गेल्यावर उपोषणकर्त्यांना भेटायला येणार का? असा संतप्त सवाल मुकुंदनगर येथील नागरिक विचारत आहेत. मुकुंदनगर येथील रहिवाशांनी अधिकृत रस्त्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणाला खोपोली शहर, खालापूर तालुका, विधानसभा मतदार संघातील एकापेक्षा एक मोठे नेते, लोकप्रतिनिधी, आजी–माजी नगरसेवक यांनी भेट दिली. पण तरीही रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. उपोषणकर्त्यांना माजी नगर–सेवक मोहन औसरमल, सुनील पाटील, प्रमिला सुर्वे, केविना गायकवाड, कय्युम पाटील, राजू गायकवाड, विनिता कांबळे औटी, वैशाली रमेश जाधव, दिलीप पुरी, मंगेश दळवी, आम आदमी पार्टीचे रियाज पठाण, ग्यासुद्दीन खान, शिवसेना तालुका प्रमुख संतोष विचारे, जितेंद्र सपकाळ, तुकाराम सुर्वे, शिवसेना खोपोली शहर संपर्क प्रमुख विवेक पाटील, भाजयुमो शहर अध्यक्ष अजय इंगुळकर, जनार्दन सावंत, प्रभाकर सुर्वे, ईश्वर कासार, आतिक खोत, कर्जत – खालापूर शिवसेना संपर्क प्रमुख पंकज पाटील, शिव सहकार शहर अध्यक्ष हरीश काळे, संघटक चंद्रकांत फावडे, मनसेचे अनिल मिंडे आदींनी भेट दिली.

## उरण शहरात पोस्ट ऑफिस कार्यान्वित

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील कोटनाका येथील पोस्ट ऑफिसचे कार्यालय जीर्ण व मोडकळीस आल्याने सदर पोस्ट कार्यालय अनेक महिन्यापासून जेएनपीटी टाउनशिप येथे स्थलांतरीत झाले होते. त्यामुळे उरण शहरातील व ग्रामीण भागा–तील नागरिकांना यामुळे विविध त्रासाला सामोरे जावे लागत होते. पोस्ट ऑफिस जेएनपीटी येथे स्थलांतरित झाल्याने वेळ पैसा श्रम अधिक खर्ची घालावे लागत होते. जेष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, शाळा कॉलेज मधील विद्यार्थी, महिला आदिंना त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे उरण शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिक पोस्ट कार्यालयाच्या प्रतीक्षेत होते.

उरण शहरातच पोस्ट ऑफिस कायमस्वरूपी राहावे अशी नागरिकांची मागणी होती.आता मात्र नागरिकांची ही चिंता मिटली असून उरण शहरातील गिरीराज अपार्टमेंट, प्लॅट नंबर १, २ इ विंग, तळमजला आनंदनगर, उरण करंजा रोड येथे हे पोस्ट ऑफिस सूरू झाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. उरण शहरात पोस्ट ऑफिस सुरु झाल्याने आता नागरिकांच्या वेळ, श्रम, पैशाची बचत होणार आहे. पंचायत समिती, पोलीस स्टेशन, नगर परिषद, तहसील कार्यालय, न्यायालय आदी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये आस्थापणे, शाळा कॉलेज जवळच असल्याने याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांसाह शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांनाही होणार आहे. सदर या पोस्ट कार्यालयाचे उदघाटन दिनांक ३/३/२०२२ रोजी सकाळी १०:३० वाजता शरण्या यु –डायरेक्टर पोस्टल सर्विस नवी मुंबई विभाग यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ अभिजित इचके सिनिअर सुप्रिडेंट, सुनील पवार –असिस्टंट सुप्रिडेंट, प्रशांत म्हात्रे –पोस्ट मास्टर उरण तसेच पोस्ट ऑफिस उरणचे अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



## पोलादपूरच्या सर्व्हिस रोडवर वाहतुकीचा खोळंबा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील पूर्वेकडील सर्व्हिसरोडवर श्रीकाळभैरवनाथ मंदिरापासून छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यापर्यंत दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास एका मोठ्या ट्रकमुळे वाहतुकीचा खोळंबा झाला. याचदरम्यान, महाबळेश्वर व रत्नागिरी येथून महाडच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची गर्दी वाढू लागली. यामुळे पोलादपूर शहरातील बाजारपेठ आणि जुना महाबळेश्वर रस्त्यावरून वाहतूक वळविण्यात आल्याने शहरातील सर्वच रस्ते वाहतूक वाढल्याने गजबजले.

पोलादपूर शहरातून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग अंडरपास पध्द–तीने जाणार असून हा महामार्ग खोल बॉक्सकटींगमधून जाणार आहे. यामुळे या महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांना पोलादपूर दिसून येणार नाही हे भविष्यात घडणार असले तरी सद्यस्थितीत या अंडरपास रस्त्याच्या दूतर्फा असलेल्या सर्व्हिस रोडपैकी पश्चिमेचा सर्व्हिसरोड ठिकठिकाणी ढासळत असल्यामुळे नादुरूस्त तसेच अर्धवट काम झालेला आहे तर पूर्वेकडील सर्व्हिसरोडवर पश्चिमेकडील सर्व्हिसरोडअभावी वाहतुकीची रहदारी वाढलेली दिसून येत आहे. गुरूवारी दुपारी एका ट्रकमुळे राष्ट्रीय महामार्गाचे काम करणारा हा पूर्वेकडील सर्व्हिसरोड ठप्प झाला असताना रत्नागिरीकडून तसेच महाबळेश्वरकडून येणारी वाहने महाडच्या दिशेने मार्गस्थ करण्यासाठी पोलादपूर शहरातील मुख्य बाजारपेठ तसेच शिवाजीनगर रस्त्यावरून वळविण्यात आली. मात्र, याचवेळी काही वाहने सर्व्हिसरोडसदृश्य महामार्गावरील वाहतुकीच्या



खोळंब्यात अडकण्याऐवजी थेट पोलादपूर शहरातून कोकणात तसेच महाबळेश्वरकडे मार्गस्थ होण्यासाठी शहरातील रस्त्यांवर आल्याने शहरातील सर्वच रस्ते भरदुपारी अचानक वाहतूक वाढल्याने गजबजले. यावेळी काही व्यापारी व स्थानिकांनी या वाहनांची कोंडी टाळण्यासाठी वाहतुक नियंत्रणाचे काम करून ही वाहने दुपारी अडीच वाजेपर्यंत मार्गस्थ केली.

### जागतिक महिला दिनानिमित्त केदार भगत मित्र परिवारातर्फे

# विविध क्षेत्रातील २१ महिलांचा सत्कार समारंभ व हळदीकुंकू तसेच चला जिंकूया पैठणीचा खेळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे केदार भगत मित्र मंडळातर्फे यंदाच्या रविवारी ६ मार्च २०२२ रोजी सायंकाळी ५ वाजता व्हि.के. हायस्कूल मागील मैदानात प्रिन्स पॅराडाईज बिल्डींग जवळ वडाळे तलावासमोर जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील २१ महिलांचा सत्कार समारंभ व हळदीकुंकू तसेच चला जिंकूया पैठणी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती लोकनेते रामशेठ ठाकूर, सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर यांची आहे.तर उद्घाटक आ.प्रशांत ठाकूर हे असणार आहे. यानिमित्ताने लकी ड्रॉ ३ पैठणी साड्या व २१ आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. या कार्यक्रमास सभागृह नेते परेश ठाकूर, महाराष्ट्र भाजपा सदस्य श्रीनंद पटवर्धन, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, उपमहापौर सिताताई पाटील, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नताई घरत, शहराध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक नितीन पाटील, नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, राजू सोनी, युवा मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, उद्योजक धिरज चावला, सौ.वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, महिला मोर्चा शहराध्यक्षा वर्षा नाईक, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, मा.नगरसेविका निता माळी, माधुरी सुरेश सावंत, गीता नितीन पाटील, पुनम भुषण ठाकूर, रेश्मा अतुल भोईर, सुहासिनी केकाणे, सपना वासुदेव पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

यावेळी महापौर कविता किशोर चौतमोल, कल्पना विलास कोठारी, कल्पना विजय लोखंडे, सुधा विजय भगत, दिव्या दत्तकुमार सावंत, मानसी हेमंतकुमार भगत, मनिषा प्रकाश म्हात्रे, रचना सनी टाकळे, संगीता नितीन जोशी, निलीमा शैलेंद्रनाथ देवळे, फाल्गुनी अभिजीत दुर्गे, साधना मोहन पवार, कविता नरेंद्र मोकल, पुष्पा काळुराम मढवी, बेबी चंद्रकांत लोखंडे, श्रीमती.अलका कमळाकर साखरे, श्रीमती.सुमन काझी, शैला प्रभाकर मोरे, पुष्पा अशोक जाधव, भारती घरत व अबोली रिक्षा संस्था यांना सन्मान स्त्री शक्तीचा अभिमान पनवेलकरांचा हा सन्मान देवून गौरविण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त माता–भगिनींनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक केदार भगत यांनी केले आहे.

## जेएनपीटी प्रशासनाविरोधात निशांत घरत यांचे आमरण उपोषण

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटीचे होत असलेले खासगीकरण त्वरित थांबवावेत, स्थानिकांना नोकरी मध्ये प्राधान्य देण्यात यावे. जेएनपीटी द्वारे निघणारे सर्व कामे स्थानिक प्रकल्पग्रस्तांना देण्यात यावे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करावे, साडेबारा टक्क्याचे त्वरित वितरण करावे आदी विविध मागण्यासाठी नवीन शेवेचे सामाजिक कार्यकर्ते तथा माजी सरपंच निशांत विष्णू घरत हे सोमवार दि २१/३/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता जेएनपीटी प्रशासन भवन समोर आमरण उपोषण करणार असल्याची माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

गेली ३ महिन्यापासून जेएनपीटी प्रशासनासोबत विविध मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी निशांत घरत यांनी अनेकदा पत्रव्यवहार केला. मात्र स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या कोणत्याच मागण्या पूर्ण झाल्या नाहीत. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी, चर्चा करण्यासाठी देखील जेएनपीटी प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात आहे.

त्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या समस्यांकडे, मागण्यांकडे जेएनपीटी प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याने जेएनपीटी प्रशासनाविरोधात आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती निशांत विष्णू घरत यांनी दिली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास समुद्रमार्गे येणारे सर्व जहाजे बंद ठेवले जातील व कंटेनर ट्रेलर देखील बंद ठेवले जातील असा कडक इशाराही निशांत घरत यांनी जेएनपीटी प्रशासनाला दिला आहे.

## भारतरत्न लतादीदींना त्यांच्याच गाण्यांवर शास्त्रीय नृत्यातून आदरांजली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती (रजि.) आणि संस्कृता फाउंडेशन ' विलेपार्ले यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या ८ मार्च २०२२ जागतिक महिला दिनी ' भारताची सुपुत्री स्वरसम्राज्ञी गानकोकिळा भारतरत्न विभूषित स्व.श्रीमती लता मंगेशकर यांना ' राम रतन धन लता मंगेशकर या शीर्षकाद्वारे भारतरत्न लतादीदींना त्यांच्याच गाण्यांवर शास्त्रीय नृत्यातून आदरांजली वाहण्यात येणार आहे. प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले ( पूर्व ) , मुंबई ४०००५७ येथील प्रशस्त प्रागंणात महिला दिनी सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



ख्यातनाम शास्त्रीय नृत्यपंडित व समकालीन सुप्रसिद्ध नृत्यांगना श्रीमती शुभदा वराडकर यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या विविध नृत्य माध्यमातील अनेक मान्यवर कलावंत लतादीदींच्या शाश्वत गीतांवर आपला नृत्याविष्कार सादर करून त्यांच्या प्रति आदरांजली व्यक्त करतील. मुंबईचे माजी महापौर व माजी आमदार स्व.रमेश यशवंत प्रभू यांनी २५ वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीची स्थापना केली. या समिती अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात विविध खेळाद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार व्हावेत, याकरिता निष्णात प्रशिक्षकांची नेमणूक केली आहे. क्रीडा प्रकारासह नृत्यकलेचेही शास्त्रशुद्ध प्रशिक्षण येथे दिले जाते. राम रतन धन– लता मंगेशकर हा कार्यक्रम आयोजित केला असून तो सर्वांसाठी विनामूल्यआहे. तरी आपण उपस्थित राहून या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा तरी उपरोक्त होणाऱ्या कार्यक्रमाचे वृत्तसंकलन करण्यासाठी कॅमेरामनसहित आपला प्रतिनिधी पाठविण्याची आपणांस विनंती करण्यात येत आहे.

## पनवेल रेल्वे स्थानक कार्यालयात चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्याने पनवेल रेल्वे स्थानकातील रेल्वेच्या कार्यालयाचे टाळे तोडून कार्यालयातील कॉम्प्युटर चोरुन नेल्याची घटना घडली आहे. सलग दोन दिवस कार्यालय बंद असल्याची संधी साधून चोरट्याने चोरी केल्याचे उघडकीस आले आले. पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. मध्य रेल्वेच्या पनवेल येथील वरिष्ठ अनुभाग अभियंता म्हणून कार्यरत असलेले रवि. एन. राऊत यांचे पनवेल रेल्वे स्थानकात कार्यालय आहे. या कार्यालयात शासकीय कामासाठी रेल्वे प्रशासनाकडून कॉम्प्युटर देण्यात आला आहे. दरम्यान, कार्यालयाला कुलूप लावून घरी निघून गेले होते. दुसऱ्या दिवशी राऊत यांना खाजगी काम असल्याने ते कार्यालयात आले नाहीत. त्यानंतर सुट्टी असल्याने देखील राऊत आपल्या कार्यालयात गेले नाही. सलग दोन दिवस सदर कार्यालय बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने राऊत यांच्या कार्यालयाचे वुलूप आणि कडी–कोयंडा तोडून कार्यालयीन कामकाजासाठी ठेवण्यात आलेला कॉम्प्युटर चोरुन नेला. सदर प्रकार उघडकीस आल्यानंतर राऊत यांनी कार्यालयात धाव घेतली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना.**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा ५७९ | १६ | १७७/१ +२/C | ०–०३–० | एकूण ४० चौ.मी. शिल्लक आहे | भूखंड क्र. ३७, सेक्टर– २३, क्षेत्र ४० चौ.मी. | **कै. अब्दुल रेहमान मो. इस्माईल (मयत) व मुमताज अ. रेहमान खामकर (मयत) यांचे वारस** १) श्रीमती खादीजा इस्माईल खामकर २) श्री. मो. अली, इस्माईल खामकर ३) श्रीमती नईमा इस्माईल खामकर ४) गुलामसाहेब अ. रेहमान खामकर **हे एकपक्षी असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह दुय्यम निबंधक, पनवेल–३ दस्त क्र. १८६७२/२०२१, हे हक्कसोडपत्र प्रमाणे **शमी अ. रेहमान खामकर** यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/४४८/२०२१–२२**